सकाळ



**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे डॉ. संतोष सुतार यांना पुरस्कार देताना.**

## डॉ. संतोष सुतार यांना पुरस्कार

**कोल्हापूर :** केरळ येथे आयोजित आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेत शिवाजी विद्यापीठातील डॉ. संतोष सुतार यांना उत्कृष्ट युवा संख्याशास्त्रज्ञ पुरस्कार दिला. डॉ. सुतार यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमध्ये कार्यरत आहेत. संख्याशास्त्रातील उत्तम संशोधनासाठी प्रा. टी. एस. के. मुथ्थू युवा संख्याशास्त्रज्ञ २०१८ पुरस्कार देऊन गौरविले. त्यांना पुणे विद्यापीठातील डॉ. टी. व्ही. रामनाथन व डॉ. यू. व्ही. नाईक-निंबाळकर यांचे मार्गदर्शन लाभले. पुरस्कार मिळाल्याबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले.

Kolhapur, Kolhapur-Today
24/12/2018 Page No. 7

लोकमत

# औषधी वनस्पतींतून विकासाची संधी

## एस. एस. बर्वे : शिवाजी विद्यापीठातील प्रशिक्षण शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतातील शेतकऱ्यांना औषधी व सुगंधी वनस्पतींची लागवड करण्याची मोठी संधी उपलब्ध आहे. त्याद्वारे त्यांनी आर्थिक विकास साधण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मुलुंड (मुंबई) येथील सायंटिफिक रिसर्च सेंटरचे उपसंचालक डॉ. एस. एस. बर्वे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा वनस्पतिशास्त्र अधिविभाग, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग, 'आत्मा'चे प्रकल्प संचालक यांच्यातर्फे 'औषधी व सुगंधी वनस्पती संवर्धन व प्रक्रिया' या विषयावरील जिल्हांतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठाच्या नीलांबरी सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, तर विभागीय कृषी सहसंचालक डी. डी. तांबाळे प्रमुख उपस्थित होते. डॉ. बर्वे म्हणाले, औषधी व सुगंधी वनस्पतींच्या क्षेत्रात शेतकऱ्यांना प्रचंड मोठ्या संधी आहेत. जगभरातील औषधे, सुगंधी द्रव्ये आणि सौंदर्यप्रसाधने निर्माण करणाऱ्या उद्योगांना त्यांची मोठ्या प्रमाणात गरज भासत असते. नैसर्गिक साधनसंपत्तीने भारत अतिशय समृद्ध आहे; तथापि, जागतिक स्तरावर या क्षेत्रातील भारताचा वाटा हा अवघा एक टक्का इतका अत्यल्प आहे. तो आणखी किमान दोन टक्क्यांनी तर आपण सहजरीत्या वाढवू शकतो. केवळ पश्चिम घाटावर लक्ष केंद्रित केले तरी बराच पल्ला गाठता येऊ शकतो. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रातील विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना औषधी व सुगंधी वनस्पती लागवडीची मोठी संधी आहे. केवळ जिरॅनियमच्या लागवडीमधूनही एकरी एक लाख रुपयांपर्यंतचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो, इतकी त्याची मागणी आहे. या कार्यक्रमास वनस्पतिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. डी. के. गायकवाड, अकल्पिता अरविंदेकर, मानसिंगराज निंबाळकर, आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातील शेतकरी प्रशिक्षणादरम्यान औषधी व सुगंधी वनस्पतींच्या प्रदर्शनाची पाहणी डॉ. एस. एस. बर्वे यांनी केली. यावेळी डॉ. अकल्पिता अरविंदेकर, डी. के. गायकवाड, मानसिंगराज निंबाळकर, आदी उपस्थित होते.

### विविध उपक्रम हाती

**प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने आपल्या संशोधनाचा लाभ व्यापक समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न चालविले आहेत. प्रयोगशाळेकडून शेतीकडे या धोरणाच्या अंगिकारातून विद्यापीठाने शेतकरी वर्गाला जोडण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत.**

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाला रग्बी स्पर्धेचे अजिंक्यपद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : रग्बी स्पर्धेच्या ७ साईड प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने अजिंक्यपद पटकावले. ही स्पर्धा भुवनेश्वर येथील केआयआयटी विद्यापीठात १९ ते २३ डिसेंबरदरम्यान पार पडली. शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने प्रथमच या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

अंतिम सामन्यात शिवाजी विद्यापीठाने चंदीगड विद्यापीठाचा २४-०७ ने पराभव केला. स्पर्धेच्या १५ साईड प्रकारात चंदीगड विद्यापीठ सोबत झालेल्या चुरशीच्या स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले.

या सामन्यात भरत चव्हाण सामनावीर ठरला. तर कर्णधार श्रीधर निगडे, गोविंद गुप्ता, सोमनाथ चव्हाण, ईश्वर हरीकोटी, प्रशांत कांबळे, श्रीधर पाटील यांनी चमकदार कामगिरी केली.

संघाला प्रशिक्षक प्रा. नीलेश पाटील, दीपक पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तर संघ व्यवस्थापक डॉ. एन. डी पाटील यांचे प्रोत्साहन लाभले. कुलगुरू देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले.



कोल्हापूर:शिवाजी विद्यापीठाचा विजयी रग्बी संघ

Kolhapur, Kolhapur-Today
24/12/2018 Page No. 7

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ संघ अजिंक्य

## अखिल भारतीय रग्बी स्पर्धा

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

पारंपरिक खेळांप्रमाणेच परदेशातील आधुनिक खेळातही क्रीडानगरी कोल्हापूरने आपला दबदबा निर्माण केला आहे. भुवनेश्वर (ओडिशा) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने अजिंक्यपद पटकावून कोल्हापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला.

स्पर्धेतील '७ साईड' प्रकारात विजेतेपदासह सुवर्ण, तर '१५ साईड' प्रकारात उपविजेतेपदासह रौप्यपदकाची कमाई केली. महत्त्वाचे म्हणजे शिवाजी विद्यापीठ प्रथमच या स्पर्धेत सहभागी झाले होते. '७ साईड'च्या अंतिम लढतीत शिवाजी विद्यापीठाने चंदिगड विद्यापीठ मोहाली संघाचा २४-७ असा एकतर्फी पराभव करून सुवर्णपदक मिळविले. तर '१५ साईड' प्रकारात चंदिगड विद्यापीठाकडून पराभव पत्करावा लागला.

**(सविस्तर वृत्त 'माय'मध्ये)**

पुढारी



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धेत अजिंक्यपद पटकाविणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत प्रशिक्षक-मार्गदर्शक.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ अजिंक्य

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धा

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

चुरशीच्या अंतिम सामन्यात चंदीगड विद्यापीठ मोहाली संघाचा २४ विरुद्ध ७ अशा गोलफरकाने एकतर्फी धुव्वा उडवत शिवाजी विद्यापीठ संघाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धेत अजिंक्यपदासह सुवर्णपदकाची कमाई केली. स्पर्धेतील '७ साईड' प्रकारात शिवाजी विद्यापीठाने हे यश मिळविले. मात्र '१५ साईड' प्रकारात शिवाजी विद्यापीठाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. चंदीगड विद्यापीठ मोहाली संघाने हा सामना १२-८ असा जिंकला.

भुवनेश्वर (ओडिशा) येथील 'के.आय.आय.टी.' विद्यापीठात १९ ते २३ डिसेंबर या कालावधीत स्पर्धा झाली. स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या भरत चव्हाणला सामनावीर किताबाने गौरविण्यात आले. '७ साईड'च्या विजेत्या संघात कर्णधार श्रीधर निगडे, उपकर्णधार भरत चव्हाण, गोविंद गुप्ता, सोमनाथ चव्हाण, ईश्वर कोटारकी, प्रशांत कांबळे, श्रीधर पाटील, विनायक पोवार, रविकिरण पाटील, तुषार पोवार, सुहास पाटील, ओमकार चोपडे आदींचा समावेश आहे. स्पर्धेत दीपराज राजेभोसले, केदार स्वामी, करणसिंह शिंदे, अनिकेत पाटील, प्रथमेश पाटील, करण फराकटे, अक्षय पाटील, मयुरेश अंगारे, कौस्तुभ नाईक, अक्षय मोळे यांनी उत्कृष्ट खेळ केला. त्यांना प्रशिक्षक नीलेश पाटील, संघव्यवस्थापक दीपक पाटील, डॉ. एन.डी. पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे आदींचे मार्गदर्शन लाभले.